**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
गोखले एज्युकेशन सोसायटी, विद्यानगर
नाशिक

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 21-01-2022**

**पालघर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-01-21 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2022-01-22 | 2022-01-23 | 2022-01-24 | 2022-01-25 | 2022-01-26 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 2.0 | 3.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 27.0 | 26.0 | 25.0 | 25.0 | 27.0 |
| किमान तापमान (अं.से) | 18.0 | 17.0 | 14.0 | 14.0 | 15.0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 87 | 90 | 78 | 75 | 70 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 70 | 75 | 70 | 69 | 68 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 3.0 | 7.0 | 6.0 | 8.0 | 8.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 170 | 285 | 51 | 44 | 41 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 3 | 5 | 1 | 0 | 0 |

## हवामान सारांश / चेतावणी:

प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक २२ व २३ जानेवारी,२०२२ रोजी पालघर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. व २४ ते २६ जानेवारी दरम्यान उघडीप राहण्याची शक्यता आहे, आणि पुढील दोन दिवस आकाश ढगाळ राहील. त्यानंतर २४ ते २६ जानेवारी दरम्यान उघडीप राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच पुढील पाच दिवस कमाल व किमान तापमानात घट होवून कमाल तापमान २५ ते २७ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान १४ ते १८ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. विस्तारित श्रेणी अंदाजानुसार दिनांक २६ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२२ दरम्यान कोंकण विभागात कमाल तापमान व किमान तापमान सरासरी एवढाच राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

दिनांक २२ व २३ जानेवारी रोजी पालघर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपात पावसाची शक्यता असल्याने परिपक्व झालेली फळे व भाजीपाला काढून घ्यावे.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

दिनांक २२ व २३ जानेवारी रोजी पालघर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपात पावसाची शक्यता असल्याने फवारणी व आंतर मशागतीची कामे वातावरण कोरडे असताना करून घ्यावीत.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भात | रब्बी उन्हाळी भातामध्ये पहिल्या ३० दिवसांपर्यंत पाण्याची पातळी २.५ ते ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी. |
| हरभरा | हरभरा पिकावर घाटे आळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे त्यामुळे या पिकावरील घाटे अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रति हेक्टर ५-१० कामगंध सापळे आणि पक्षी थांबे लावावेत, तसेच जर जास्त प्रादुर्भाव दिसून आल्यास घाटे आळीच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्क किंवा आझाडीरेकटीन ३०० पीपीएम ५ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून वातावरण कोरडे असताना फवारणी करावी. |
| कॅश | काजू पिकावर सध्या ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. मोहोराचे ढेकण्या व फुलकिडीपासून संरक्षण करण्यासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फलधारणेच्या अवस्थेत लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रती १० लिटर पाणी मिसळून फवारणी करावी. (सदर किटकनाशके लेबल क्लेम नाहीत ) |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| आंबा | आंब्यावर सध्या भुरी व करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने या रोगाच्या नियंत्रणासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्याबरोबर ढगाळ व पावसाचे वातावरणामुळे करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बनडयाझियम १२% मॅन्कोंझेब ६३ % १० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मोहोर फुलत असताना ते फळधारणा होईपर्यंत परागीकरणसाठी आवश्यक असणाऱ्या मध माश्यांना हानिकारक अश्या रासायनिक किटक नाशकांची फवारणी करणे टाळावे. पालवी/मोहोर अवस्थेतील आंब्यावर तुडतुड्यांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असून, तुडतुडे मोहोरातील, कोवळ्या फळातील रस शोषून घेतल्यामुळे मोहोराची गळ होते यासोबतच तुडतुडे मधासारखा चिकट पदार्थ शरीरावाटे बाहेर टाकतात आणि तो पानांवर पडल्यामुळे त्यावर काळी बुरशी वाढते. तुडतुड्यांनी आर्थिक नुकसानीची पातळी (पालवी/मोहोर अवस्था ->५ तुडतुडे प्रती पालवी/मोहोर) ओलांडली असल्यास कीटकनाशकाची फवारणी करण्यात यावी यासाठी बोंगे फुटण्याच्या अवस्थेत लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रती १० लिटर पाणी, मोहोर फुलण्यापूर्वीच्या अवस्थेत इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.ली. किंवा ब्युफ्रोफेझीन २५ टक्के प्रवाही २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि मोहोर फुलल्यानंतर कणी अवस्थेत असताना थायोमेथोक्झाम २५ टक्के दाणेदार १ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वातावरण कोरडे असताना फवारणी करावी. सध्या आंब्याची फळे वाटाण्याच्या, सुपारीच्या व अंडाकृती आकाराची असताना फळगळ होत असेल तर १ टक्का पोट्याशीयम नायट्रेट ( १०० लीटर पाण्यामध्ये १ किलो ) व अर्धा टक्का सूक्ष्म अन्न द्रव्यांच्या तीन फवारण्या कराव्यात. फळधारणा झाल्यानंतर ज्या ठिकाणी पाण्याची सोय असेल अश्या बागेमध्ये १५ दिवसाच्या अंतराने तीन ते चार वेळा पाणी द्यावे. |
| चिकू | चिकू फळातील बी पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी चिकू बागेतील किडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे व पाला पाचोळा गोळाकरून जाळून नष्ट करावा. तसेच ५० टक्के प्रवाही प्रोफेनोफोस १५ मि. ली. २.८ टक्के प्रवाही डेल्टामेथ्रीन १० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. चिकूच्या १ वर्षाच्या प्रती कलमास ५ किलो शेणखत, १५० ग्रॅम युरिया, ४५० ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट आणि १५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश खताचा दुसरा हप्ता कलमाच्या विस्ताराच्या थोडीशी आत बांगडी पद्धतीने चरात देवून चर बुजवून घ्यावा. पहिल्या वर्षी दिलेल्या खताच्या मात्रेच्या दुसऱ्या वर्षी दुप्पट, तिसऱ्या वर्षी तिप्पट या प्रमाणे वाढवून २० वर्षा पर्यंत २० पट खताचा हप्ता द्यावा. २० वर्षानंतर प्रती कलमास १०० किलो शेणखत, ३ किलो युरिया, ९ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताचा दुसरा हप्ता देण्यात यावा. |

| **फळे आणि भाजीपाला पिक** | **फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला** |
|---|---|
| मिरची | ढगाळ वातावरण असल्याने मिरची पिकावर भुरी रोग येण्याची शक्यता आहे. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी पाण्यात विरघळणारे गंधक २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. तसेच फुलकिडे, कोळी व पांढरी माशी या रस शोषक किडीमुळे चुरडा मुरडा / बोकड्या रोगाचा प्रादुर्भाव होवू शकतो. या किडी पानातील रस शोषून घेतात त्यामुळे पाने सुरकुततात व पानांची वाढ खुंटते. या किडीच्या नियंत्रणासाठी आझाडीरेकटीन १०००० पीपीएम ३ मिली किंवा डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १ मि ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. किंवा अॅसीटामाप्रीड २० % एस. पी. ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच निळ्या रंगाचे चिकट सापळे एकरी २०- २५ या प्रमाणात लावावेत. वांगी फुलोरा अवस्थेत असतील तर शेंडा व फळे पोखरणाऱ्या आळीचा प्रादुर्भाव दिसून येवू शकतो त्यासाठी प्रति एकर आठ या प्रमाणात ल्युसिलूर काम गंध सापळे लावावेत. तसेच वांगी पिकामध्ये जिवाणूजन्य व बुरशिजन्य मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे त्यामुळे जिवाणूजन्य मर होत असेल तर प्रादुर्भित झाडे उपटून नष्ट करावीत व बुरशीजन्य मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशकाची ५ ग्रॅम प्रति लीटर पाण्यात मिसळून झाडांच्या बुंध्या भोवती आळवणी करावी. |
| कार्ले | ढगाळ वातावरणामुळे वेलवर्गीय भाजीपाला पिकांवर केवडा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येवू शकतो, केवडा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बनडयाझियम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात फवारणी करावी. भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास या रोगाच्या नियंत्रणासाठी ५ मि.ली हेक्झाकोनाझोल १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फळमाशीच्या नियंत्रणास 'मिथाईल युजेनोल' किंवा 'क्यु-लुअर रक्षक सापळे जमिनीपासून १ ते २ फूट उंचीवर प्रति हेक्टरी ४ लावावेत. |